Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(A)| April-2026

Original Article

# पेशवेकालीन (रमणा) एक धार्मिक दान पद्धती

**प्रा. डॉ. विलास सोमा गोर्डे**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,
मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
आळे, ता. जुन्नर , जि. पुणे

**Manuscript ID**:
JRD -2026-180405
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4(A)
Pp 17-20
April- 2026
**Submitted:** 18 Mar. 2026
**Revised:** 28 Mar. 2026
**Accepted:** 12 Apr. 2026
**Published:** 30 April. 2026

**गोषवारा :**

पेशवे काळामध्ये धार्मिक विधींना महत्त्व प्राप्त झाले होते. पेशवाईतील ब्राह्मण, मराठे व इतर सर्व जातींचे लोक एकाच विचारसरणीत वाढले होते . त्यांच्यामध्ये देव भोळेपणा अमर्याद होता. पहिल्या बाजीरावाच्या काळात मराठी सरदार उत्तरेकडे पराक्रम गाजवू लागले संकटाशी झुंजणे व त्यातून मार्ग काढणे हा एक उपक्रम बनला होता. तरी पण काही कृत्ये केवळ प्रयत्नाने साध्य होण्यास कठीण असतात. अशावेळी त्यामध्ये यश येण्याकरिता देवांची भक्ती करणे, अनुष्ठाने बसविणे, दान देणे, नवस बोलणे व ते पाळणे या उपायांचा अवलंब सामान्य माणसांप्रमाणेच पेशवे ही करत होते. त्यामुळे धार्मिक विधी करणाऱ्या ब्राह्मणांना या काळात महत्व प्राप्त झाले होते. धार्मिक विधी करणाऱ्या ब्राह्मणांना शिक्षण देणारी विद्यापीठे किंवा पाठशाळा त्याकाळी महाराष्ट्रात नव्हत्या परंतु जास्तीत जास्त वेद अभ्यास असणाऱ्या ब्राह्मणांचा एक मेळावा दरवर्षी श्रावण महिन्यात पुणे येथे भरत असे. व या मेळाव्यास महाराष्ट्र बाहेरील ब्राह्मणही येत असत. याप्रसंगी ब्राह्मणांचा वेदाभ्यास पाहून त्यांना दक्षिणा वाटली जात असे. या ब्राह्मण मेळाव्यास "रमणा" असे म्हटले जात असे या शोधनिबंधात पेशवेकालीन रमणा पद्धतीची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे .

**प्रास्तविक :**

छत्रपती राजाराम महाराजांना जिंजी वरून महाराष्ट्रात येताना सरदार दाभाडे यांनी मदत केली होती. त्यामुळे पुण्याजवळील तळेगाव हे गाव व सरदारकीचे वतन दाभाडे यांना छत्रपती राजाराम यांनी दिले होते. छत्रपती शाहू महाराजांच्या काळात मराठ्यांचे सरदार म्हणून त्रिंबकराव दाभाडे हे पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या मार्गदर्शनाखाली पराक्रम गाजवत होते. गुजरात प्रांतातील चौथाईच्या प्रश्नावरून आडस येथे कंठाजी कदम बांडे, अळकुटी त्रिंबकराव दाभाडे, तळेगाव दाभाडे, पिलाजीराव जाधव या मराठी सरदारांमध्ये लढाई झाली या लढाईत १ एप्रिल १७३१ रोजी त्रिंबकराव दाभाडे मारले गेले [१]. त्रिंबकराव दाभाडे हे तळेगाव येथे श्रावण महिन्यात ब्राह्मणांची परीक्षा घेऊन त्यांना तळेगाव मध्ये दानधर्म करत असत मात्र त्रिंबकराव दाभाडे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वतीने श्रावण महिन्यात दक्षिणा वाटपाचे काम त्यांच्या पश्चात पहिल्या बाजीराव पेशव्यांनी पुणे येथे सुरू केले [२] . तेव्हापासून पेशवे घराण्यामध्ये ही रमण्याची पद्धत सुरू झाली. पेशवाईचा विस्तार जसा जसा वाढत गेला तसा तसा रमण्यातील दक्षिणेचा आकडाही वाढत गेलेला दिसतो. श्रावण महिन्यामध्ये दानधर्म केल्यामुळे पुण्य संचय होतो असा त्याकाळी समज होता व त्यामधूनच ब्राह्मणांना दान देण्याची ही पद्धती सुरू झाली होती. पहिल्या बाजीरावाने ही पद्धती पुण्यात सुरू केली पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीमध्ये दक्षिणेची रक्कम लहान होती परंतु पेशवाईचा जसा विस्तार होत गेला तसा या धार्मिक दक्षिणेचा आकडाही वाढलेला दिसतो.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.20374401
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा. डॉ. विलास सोमा गोर्डे सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आळे, ता. जुन्नर , जि. पुणे*

**How to cite this article:**
*गोर्डे, विलास. सोमा. (2026). पेशवेकालीन (रमणा) एक धार्मिक दान पद्धती. Journal of research & development, 18(4(A)), 17–20.* https://doi.org/10.5281/zenodo.20374401

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4(A)| April-2026

इसवी सन १७३६ मध्ये दक्षिणेची रक्कम १६३५४ एवढी होती (३). पेशव्यांचा वरदहस्त लाभल्यानंतर दक्षिणेच्या आशेने करून लोक विद्या शिकू लागले होते. जुन्या पाठशाळा भरभराटीस आल्या व नव्या पाठशाळा स्थापन करण्यास विद्वानांना उत्तेजन मिळाले. कृष्णा, गोदावरी, भीमा इत्यादी नद्यांच्या काठी भिक्षुक वर्गाने नवी क्षेत्रे वसविली. पेशव्यांच्या दक्षिणेची कीर्ती हिंदुस्थानात पसरल्यामुळे दक्षिण हिंदुस्तान, कर्नाटक, उत्तर हिंदुस्तान, गुजरात इत्यादी प्रांतातून ब्राह्मण रमण्यासाठी पुण्यात येऊ लागले. आलेल्या ब्राह्मणांना त्यांची विद्वत्ता , पावित्र्य व चारित्र्य पाहून दक्षिणा वाटली जात असे. हा रमणा दरवर्षी एखाद्या जत्रेप्रमाणे पर्वतीच्या पायथ्याशी नियमितपणे भरत असे (४). संपूर्ण हिंदुस्तानातील हजारो ब्राह्मण यामध्ये सहभागी होत असत. रमण्याची दक्षिणा वाटण्यासाठी पर्वतीच्या पायथ्याशी नानासाहेब पेशवे यांनी इसवी सन १७५२ मध्ये एक भक्कम दगडी तटबंदी असणारी भव्य इमारत बांधली पुढे या इमारतीलाच "रमणा" हे नाव पडले. या इमारतीच्या बांधकामा संबंधी शकावली मध्ये पुढील प्रमाणे उल्लेख आढळतो. "राजश्री भाऊसाहेब पेशवे पर्वतीस जाऊन रमणियाचा ओटा बांधला.ब्राह्मणास दक्षिणा द्यावया कारणे ही तजवीज श्रावण शु॥ ७ मध्ये केली. नंतर शु॥ ८ ला सोमवारी पुण्यात ब्राह्मणास दक्षिणा द्यावयास प्रारंभ केला" (५). दक्षिणेच्या रकमेचे आकडे विविध कागदपत्रांमध्ये पाहावयास मिळतात उदाहरणादाखल काही वर्षाची आकडेवारी खालील प्रमाणे.

इ. स. १७३६ - १६३५४ / - रूपये
इ. स. १७३७ - ४९०७३/ - रुपये
इ. स. १७४९ - १, २३, ५३०/- रुपये
इ. स. १७५२ - ६,२८,३५३ / - रूपये
इ. स. १७५३ - २,०६,०१९ / - रूपये
इ. स. १७६२ - ११,८९८ / - रूपये
इ. स. १७६५ - १,३२,०४३ / - रुपये
इ. स. १७६८ - २ ,८८,४७५ / - रूपये
इ. स. १७७६ - ५ ,०५, १२८ / - रूपये
इ.स. १७८८ - २ ,१८, ६३० / - रूपये
इ. स. १७८९ - २, २५, ३५४ / - रूपये

वरील आकडेवारी मनोरंजक असून त्यावेळची सामाजिक व आर्थिक स्थितीची कल्पना येण्यास मदत होते. इसवी सन १७६२ मध्ये दक्षिणेचा आकडा अगदी क्षुल्लक हजारात दिसतो. ही गोष्ट अर्थपूर्ण म्हणून नोंदवावी लागेल याचे कारण म्हणजे तिसऱ्या पाणीपत युद्धात इसवी सन १७६१ साली महाराष्ट्राचा पानिपत च्या युध्दात दारुण पराभव झाला होता. पेशवे या पराभवाच्या धक्क्यातून सावरले नव्हते व त्याचा परिणाम दक्षिणेच्या रकमेवरही झालेला दिसून येतो. पुढील काळात स्थिरता प्राप्त झाल्यानंतर सवाई माधवरावांच्या कारकिर्दीमध्ये दक्षिणेचा आकडा सव्वा पाच लाख रुपयांपर्यंत गेलेला दिसून येतो. त्यामुळे सर्व हिंदुस्थानातून सर्व भागातून विद्वान लोक पुण्यात येऊ लागले. शृंगेरी , कांजीवरम , श्रीरंगपट्टणम , तंजावर , रामेश्वर तसेच उत्तरेकडून बनारस , कनोज ग्वाल्हेर, मथुरा इत्यादी ठिकाणाहून ब्राह्मण पुण्यात येऊ लागले यामध्ये सर्व शाखांचे व सांप्रदायांचे ब्राह्मण असत. वैदिक, वय्याकरणी, ज्योतिषी, पंडित, कवी, दशग्रंथी, वेदांती, न्यायशास्त्री , साधुसंत, वैद्य इत्यादी विद्वत्तजनांचा समावेश होता. या ब्राह्मण मंडळींना त्यांच्या सन्मानानुसार जास्तीत जास्त १००० रुपये व कमीत कमी ५ ते १० रुपये अशी दक्षिणा वाटप होत असे सर्वश्रेष्ठ विद्वानाला शनिवार वाड्यावर नेऊन त्याचा सन्मान करून भोजनाची व्यवस्था केली जात असे (६).

दरवर्षी श्रावण महिन्यात रमण्याच्या कार्यक्रमासाठी हजारो ब्राह्मण गोळा होत असत. त्यामुळे हा दक्षिणा वाटपाचा कार्यक्रम पोलीस व लष्कर यांच्या सहकार्याने चालत असे. इसवी सन १७७७ च्या श्रावण महिन्यामध्ये चाकण शहरातून ०५ ब्राह्मण गेले होते त्यांना दक्षिणा देण्यात आली होती (७). इसवी सन १७७५ च्या श्रावण महिन्यातील रमणा कार्यक्रमासाठी पुणे शहरांमध्ये मोठा बंदोबस्त करण्यात आला होता. त्यासाठी राज्याच्या विविध भागातील सैनिक बंदोबस्तासाठी बोलवण्यात आले होते. चाकणचा किल्लेदार भगवंत नारायण यांच्याकडून १० सैनिक बोलविण्यात आले होते मात्र त्याने १५ सैनिक पाठवले त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली (८). सवाई माधवरावांच्या कारकिर्दीमध्ये रमण्याची दक्षिणा बरीच वाढली होती इसवी सन १७७३ मध्ये हा आकडा ५,५४,४४५ /- रुपये

एवढा होता. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीमध्ये हा आकडा आठ लाखापर्यंत गेला परंतु खेदाची बाब म्हणजे दुसऱ्या बाजीरावाच्या काळात विद्वानांची परीक्षा घेण्याची पद्धती बंद झाली होती (९) .

इ. स. १७९७ मध्ये कॅप्टन मूर या इंग्रज गृहस्थाने पर्वती जवळील रमण्याचे वर्णन केले आहे. पर्वती पुण्याच्या दक्षिण टोकास असलेली एक उंच टेकडी आहे. या टेकडीवर एक सुंदर पर्वतीचे मंदिर आहे. या पर्वतीच्या पायथ्याला रमण्याच्या इमारतीमध्ये श्रावण महिन्यात हा कार्यक्रम भरतो. यावर्षी पर्वती जवळ रमण्याच्या प्रसंगी ४० हजार ब्राह्मण गोळा झाले होते. पर्वतीच्या पायथ्यावर हा जमाव यात्रेसारखा जमला होता. विद्वान ब्राह्मण गर्दीत सहभागी होत नसत त्यांची व्यवस्था शनिवार वाड्यावर होत असे. पर्वतीच्या टेकडीवर काही बांधिव वास्तु होत्या. रमण्याची इमारत उंच तटबंदीच्या भिंतींनी चौरसाकृती बांधलेली होती या तटबंदीला चार प्रवेशद्वारे असून एक दिंडी दरवाजा आहे. दक्षिणा वाटप रमणा प्रसंगी येथे फक्त ब्राह्मणांनाच प्रवेश दिला जातो. परंतु कॅप्टन मूर व कॅप्टन गार्डनर यांनी वशिलेबाजीने आज प्रवेश मिळाला होता.

चार पैकी तीन दरवाज्यातून ब्राह्मणांना आत सोडले जात होते. कढईतील तांबड्या पाण्यात कुंकवा मध्ये हात घालून दरवाज्याच्या तोंडाशी येणाऱ्या ब्राह्मणाच्या शरीरावर व कपड्यावर किंवा कपाळावर गंध लावला जात होता. आणि नंतर त्यास प्रवेश दिला जात असे. संध्याकाळी सहा वाजेपर्यंत तेथील प्रांगण अर्धे सुद्धा भरले नव्हते. व काही हजार ब्राह्मण प्रतीक्षेत उभे होते.शेजारीच नाण्यांच्या वजनांचा आणि पैशांच्या खुळखुळण्याचा आवाज येत होता. या ब्राह्मणांना रात्री दहा वाजेपर्यंत प्रवेश दिला जात होता. पैसे डबल देण्यात येऊ नये म्हणून कुंकवाच्या पाण्याने ब्राह्मणाच्या कपड्यावर हाताचा ठसा उमटवीत होते. प्रत्येकाने आपले ठसा मारलेले वस्त्र व कपाळाचा गंध दाखवून दक्षिणा घ्यायची व तेथून गमन करण्याची पद्धत होती. सामान्यतः ३ ते १० रुपयांपर्यंत दक्षिणा या ठिकाणी वाटली जात होती. रमण्याच्या दरवाज्यावरील व्यवस्थेत एका दरवाजावर श्रीमंत पेशवे दुसऱ्या दरवाजावर अमृतराव व चिमाजी आप्पा व तिसऱ्या दरवाजावर नाना फडणीस हे होते दौलतराव शिंदे ही आत मध्ये होते. ते संध्याकाळी पाचच्या सुमारास घोड्यावर बसून निघून गेले यावेळी श्रीमंत पेशव्यांनी जवळजवळ पाच लाख रुपये दक्षिणा वाटली (१०).

कॅप्टन मूर व कॅप्टन गार्डनर हे यावेळी येथे हजर होते. त्यांनी अतिशय यथार्थ वर्णन या घटनेचे केले आहे.त्यांच्या यावेळी एक विलक्षण घटना लक्षात आली की ज्या व्यक्तीने त्यांना रमण्याच्या ठिकाणी प्रवेश मिळवून दिला होता. त्याने एक रुपयाची सुद्धा बिदागी घेतली नाही. कारण तो ब्राह्मण नव्हता ज्यावेळी हे इंग्रज गृहस्थ गर्दीत मिसळले त्यावेळी त्याच्या शर्टच्या खिशातून काहीतरी वस्तू कोणीतरी घेऊन गेल्याची जाणीव झाली. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीमध्ये रमणा ही दक्षिणा देणारी संस्था म्हणून उदयास आली दक्षिणेच्या पोटी वार्षिक ८ ते १० लाख रुपयांचा चुराडा होत असे. परंतु ती सर्रास सर्वांना सारखी वाटली जात नसे. त्यात भेदभाव केला जात असे व तोंड पाहून दक्षिणा देण्याची पद्धती चालू झाली. ब्राह्मणांची परीक्षा किंवा विद्वत्ता तपासण्याची पद्धती बंद झाली. दुसरा बाजीराव स्वतः आणि त्याचे सरदार व मंत्री गण यांनी सुज्ञ ब्राह्मणांना विविध कार्यालयातून धार्मिक विधीसाठी नियुक्त केले होते ती सर्व धर्मार्थ संबंधित मंडळी होती एवढेच नव्हे तर धार्मिक तत्त्वावर अनेक ब्राह्मणांना भत्ता दिला जात होता. परंतु धार्मिक कार्यात त्यांचा काडीमात्र संबंध येत नसे. त्यामुळे अनेकांना फुकट पैसे मिळत असत.

या रमणा पद्धतीमध्ये सहभागी होण्यासाठी हौशी ब्राह्मणही येत असत. कॅप्टन मूर यांना असाच एक खुशाल चेंडू ब्राह्मण भेटला होता. तो बाहेरच्या बाजूस वाट पाहत उभा होता. त्याला विचारले असता तो म्हणाला की मला पाच सात किंवा दहा रुपये मिळाले तरी चालतील. मात्र एवढ्या कमी रकमेची तू अपेक्षा का करतोस असे विचारले असता तो म्हणाला की हा सगळा नशिबाचा खेळ आहे. तो सुरत वरून आला होता. बहुतेक तो गरीब असावा शिवाय त्याने समर्थन केले की यानिमित्ताने माझा प्रवासही झाला. वाटेत भिक्षुकीही मिळाली. काही तीर्थक्षेत्रेही झाली. परिचित व्यक्तींच्या गाठीभेटी झाल्या. यावेळी कॅप्टन मूर ने त्यास सदिच्छा देऊन ३०० रुपये मिळतील असे सांगितले त्यावेळी त्याने गेल्या वर्षी फक्त तीन रुपये मिळाल्याचे सांगितले.यावरून ज्याची ओळख नव्हती त्याला दक्षिणा कमी मिळत होती. तरीसुद्धा रस्त्याने मिळणारा दानधर्म व भिक्षुकी मिळून परत जाईपर्यंत प्रत्येकाच्या जवळ आदमासे ३०० रुपये पर्यंतची रक्कम जमत असे (११). दक्षिणा वाटपास सुरुवात नागपंचमीच्या दुसऱ्या दिवसापासून म्हणजे षष्ठीपासून सुरुवात होऊन श्रावण शुद्ध दशमीला हा कार्यक्रम संपत असे. पुणे शहरातील इतर सुख वस्तु लोक देखील ब्राह्मणांचा सत्कार करून त्यांना दक्षिणा देत. व भोजन देत असत. त्यामुळे ब्राह्मण कुटुंबांची वर्षाची बेगमी किंवा तरतूद होत असे. पुण्याहून जे ब्राह्मण दक्षिणा घेऊन येत असत ते गावी गेल्यावर आपल्या पदरी चार दोन शिष्य बाळगून त्यांच्याकडून वेद अध्ययन करून घेत असत. या पद्धतीमध्ये पूर्वजांनी मिळविलेली विद्या जतन करण्याचे कार्य घडत होते. इसवी सन १८१८ मध्ये पेशवाई चा पाडाव झाला. पुण्याच्या शनिवार वाड्यावर ब्रिटिशांचे

वर्चस्व निर्माण झाले. पुण्याचा ब्रिटिश अधिकारी माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याने ही पर्वती जवळील सार्वजनिक दक्षिणा वाटपाची रमणा पद्धती बंद केली. त्या ऐवजी संस्कृत पाठशाळांना अनुदान देणे सुरू केले.

**निष्कर्ष :**

१) पुण्यातील पेशवे काळातील रमणा ही सार्वजनिक दक्षिणा वाटपाची पद्धती धार्मिक स्वरूपाची होती व त्यामध्ये फक्त ब्राह्मणांनाच दक्षिणा मिळत असे.

२) पेशवे काळातील आर्थिक व राजकीय स्थैर्यावर रमण्याच्या दक्षिणेची रक्कम कमी किंवा जास्त झालेली दिसते.

३) श्रावण महिन्यामध्ये ब्राह्मणांना दानधर्म केल्यास पुण्य संचय होतो ही धार्मिक धारणा तत्कालीन समाजामध्ये होती.

४) रमणा पद्धतीमुळे देशातील बहुतांश भागातील ब्राह्मण एकत्र येऊन त्यांच्यामध्ये धार्मिक अभ्यासाविषयी जागृती निर्माण झाली होती.

**संदर्भ व तळटीपा :**

1) गो. के. चिटणीस , "**राज्यकर्ते गायकवाड काही ऐतिहासिक प्रसंग १७२०-१८२०**", गायकवाड प्रिन्टर्स प्रा. लि. बडोदे, १९८५, पृ. ३५.
2) वा. कृ . भावे, "**पेशवेकालीन महाराष्ट्र** ", वरदा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृती, १९९८, पृ. ७४ .
3) वा. कृ. भावे, उपरोक्त, पृ. ७५.
4) द. ब. पारसनीस (अनु.), सु. र. देशपांडे, "**पेशवे कालीन पुणे**", डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती , २००७, पृ. ४३.
5) वा. कृ. भावे, "पूर्वोक्त", पृ. ७५.
6) द. ब. पारसनीस, "पूर्वोक्त", पृ. ४४.
7) वि. सो. गोर्डे, "**चाकणचा इतिहास**", डॉ. वि. ब. वनारसे सेवा प्रतिष्ठान, सांगवी, पुणे, प्रथम आवृती, २०१६, पृ. ११९.
8) ग. चि. वाड (संपा.), "**माधवराव पेशवे यांची रोजनिशी**", भाग -१, अंक ३, पुणे, १९११, पृ. २०१.
9) गो. स. सरदेसाई, "**मराठी रियासत**", खंड ७, मुंबई , १९८९, पृ. ४७६.
10) द. ब. पारसनीस (अनु.), सु. र. देशपांडे, "पूर्वोक्त", पृ. ४९.
11) वा. कृ. भावे, "पूर्वोक्त ", पृ. ७९.